MHMM130082452023

दाखल दिनांक : २८/०३/२०२३
नोदंणी दिनांक : २८/०३/२०२३
निकाल दिनांक : १७/११/२०२५
कालावधीः ०२ व. ०७ म. २० दि.

## भाग अ

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ५७ वे न्यायालय,**
**कुर्ला, मुंबई यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी — भा. चां. मोरे)**

**निशाणी क्र.—१०**

**फौ. स. खटला क्रमांक : २५६८/पीएस/२०२३**

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे गोवंडी पोलीस ठाणे, मुंबई गुन्हा नोंद क्र.४५८/२०२२ |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | श्री. ढेकणे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| | विरूध्द |
| आरोपी | **सरोज रमेश जाधव,**<br>वय — सज्ञान, व्यवसाय — चालक,<br>पत्ता — राधाबाई चाळ, ग्रुप नं.१०९, चाळ नं. १००, रूम नं.१०, कामराज नगर, मुंबई—७१. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. पांडे |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १४.०९.२०२२ |
| तक्रार/दोषारोप दाखल दिनांक | २८.०३.२०२३ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | ०३.११.२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | १७.११.२०२५ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १७.११.२०२५ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | —— |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सरोज रमेश जाधव | .... | .... | भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३८ सह कलम १८४, १३४ (अ)(ब) मोटर वाहन कायदा अन्वये. | निर्दोष | .... | .... |

## <u>भाग क</u>

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी</u>

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार | निशाणी | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| सा. क्र. १ | निशाणी—०४ | रेश्मा दयानंद कांबळे | फिर्यादी |
| सा. क्र. २ | निशाणी—०५ | दयानंद गोपाळ कांबळे | साक्षीदार |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| .... | निरंक | .... |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| .... | निरंक | .... |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी—७ व ८ | घटनास्थळ पंचनामा आणि वैदयकिय प्रमाणपत्र |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशाणी क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| .... | निरंक | .... |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| .... | निरंक | .... |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| .... | निरंक | .... |

## न्यायनिर्णय
**(पारित दि.१७/११/२०२५)**

हयगयीने, निष्काळजीपणाने तसेच बेदरकारपणे वाहन चालवून फिर्यादीला आणि साक्षीदाराला गंभीर दुखापत करण्यास कारणीभूत झाला आणि जखमींना कोणतीही मदत न करता पळून गेल्याचा आरोपीविरूध्द आरोप आहे.

२. अभियोग पक्षाचे संक्षिप्त कथन असे की, रेश्मा दयानंद कांबळे राहणार मोहिते चाळ, बौद्ध विहाराजवळ, सम्राट अशोक नगर, गोवंडी, मुंबई (थोडक्यात फिर्यादी) यांचा मुलगा अक्षोम याचा दिनांक १४/०९/२०२२ रोजी वाढदिवस होता. त्यामुळे ती व तिचे पती मुलास घेऊन दुचाकी क्रमांक एमएच०३—डीएन्—५८७० या गाडीने चेंबूर येथे फरसाण आणण्यासाठी गेले होते. दुपारी ३.१५ च्या सुमारास ते नीलम जंक्शन, गोवंडी, चेंबूर स्टेशन रोड येथे आले असता सिग्नल चालू झाल्याने चेंबूर स्टेशनच्या दिशेने जात असताना देवनारकडून येणाऱ्या ॲम्ब्युलन्स क्र.एमएच०३—डीव्ही—११९५ या गाडीने सिग्नल तोडून त्यांच्या दुचाकीस जोराची धडक दिली. त्यामुळे ते तिघे खाली पडले, ॲम्ब्युलन्स चालकाने ते पाहूनही तो तिथे त्यांना मदत न करता निघून गेला. सदर धडकेने फिर्यादीच्या डाव्या डोळयाच्या भुवईतुन रक्त आले. नंतर उपचारासाठी शताब्दी हॉस्पिटल गेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून उपचार केले. तसेच फिर्यादीच्या उजव्या पायाचा एक्सरे काढला व अंगठा आणि पायाची बोटे फ्रॅक्चर असल्याचे सांगितले. तसेच बाकी दोघांवरती देखील उपचार करण्यात आले. उपचारानंतर फिर्यादीने आरोपीविरूध्द तक्रार दिली. सदर फिर्यादीवरून प्रथम माहिती अहवाल क्र.४५८/२०२२ दाखल झाला. सदर गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरिक्षक श्री कर्चे यांनी करून अंतिम अहवाल न्यायालयात पाठविला

३. आरोपीचे प्रतिकथन (नि.क्र.०२) वर नोंदविले. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटल्यास सामोरे जाण्याचे ठरविले. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आला नाही. पुरावा नसल्याने आरोपीचा जबाब फौ. प्र. सं. कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदविण्यात आला नाही.

४. निर्णयासाठी निर्माण होणारे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे :—

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.१४.०९.२०२२ रोजी दुपारी ३.१५ च्या सुमारास निलम जंक्शन सिग्नल, गोवंडी चेंबूर स्टेशन रोड, चेंबूर, मुंबई येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील ॲम्ब्युलन्स नं. एमएच०३—डीव्ही—११९५ ही मानवी जिवीतास धोका होईल अशा रितीने हयगयीने व निष्काळजीपणाने चालविल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नाही |
| २. | वरील दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीला गंभीर दुखापत केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नाही |
| ३. | वरील दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन आम जनतेस धोकादायक होईल अशा पध्दतीने रस्त्याच्या परिस्थितीचा व तेथील वाहतूकीचा विचार न करता चालविल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नाही |
| ४. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने अपघातानंतर जखमींना कोणतीही वैदयकिय मदत न देता घटनास्थळावरून पळून गेल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नाही |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>कारणमिमांसा</u>**

५. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरण दि.०१.०७.२०२४ पूर्वीचे असल्याने जुन्या फौजदारी कायद्याप्रमाणे निकाली काढले.

<u>मुद्दा क्रमांक — १ ते ४</u>

६. सदर प्रकरणी फिर्यादी व दयानंद यांची साक्ष अभिलेखात आहे. फिर्यादीने घटनेची वेळ, ठिकाण व दिनांक नमूद केली मात्र धडक देणारी गाडी व त्या गाडीच्या चालकाबद्दल काहीही नमूद केले नाही. त्यांना ओळखू शकत नाही असेही फिर्यादीने सांगितले. फिर्यादीतील मजकूर आठवत नसल्याचे फिर्यादीने नमूद केले. सरकारी वकिलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला मात्र फिर्यादीने सरकारपक्षास पूरक असे विधान केले नाही. त्याचप्रकारे दयानंद यानेही फिर्यादीच्या वरील पुराव्याप्रमाणेच साक्ष नोंदविली. त्याने पुराव्यात घटनेची वेळ, ठिकाण व दिनांक सांगितली मात्र धडक देणारा गाडीचालकाबद्दल काहीही निवेदन केले नाही. सबब, सरकारी वकिलांनी उत्तर सूचक प्रश्न विचारूनही या साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत केली नाही. आरोपीपक्षाने घटनास्थळ पंचनामा व वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी — ७ व ८) मान्य केलेले आहेत. परंतु खुद्द प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी अभियोगपक्षास मदत केली नाही. त्यामुळे साक्षीदार जखमी झाले आहे हे उभयपक्षी मान्य असले तरी त्यांच्या दुखापतीस आरोपी वा त्याची हयगय कारणीभूत आहे शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपीला दोषी ठरवण्याइतपत पुरावे अभिलेखात नाहीत. परिणामी, मुद्दा क्रमांक १ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ५ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो :—

## <u>आदेश</u>

१) **आरोपी नामे सरोज रमेश जाधव** यांची भारतीय दंड संहिता, कलम २७९, ३३८ सह कलम १८४, १३४(अ)(ब) मोटरवाहन कायदा अन्वये गुन्हा केल्या प्रकरणी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७—अ नुसार अपील

कालावधीसाठी आरोपीने जामीन द्यावा.

३) आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

न्यायालयात जाहीर केले.

BHAUSAHEB CHANGDEV MORE

Digitally signed by BHAUSAHEB CHANGDEV MORE
Date: 2025.11.29 13:25:03 +0530

( भा. चां. मोरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
५७ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई.

दिनांक : १७.११.२०२५
पअका

न्यायनिर्णय श्रुतलेखन : १७.११.२०२५
न्यायनिर्णय प्रतिलिपित: १७.११.२०२५
न्यायनिर्णय स्वाक्षरी : १७.११.२०२५